वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

विद्यापीठाने निर्मिती केलेले सुधारीत व संकरीत वाणाबद्दल सर्व समावेशक व सविस्तर माहिती

अ.क्र.	तपशील		सविस्तर माहिती
१	पीक/वाणाचे नाव		भात : तेरणा
२	प्रसारीत केल्याचे वर्ष		१९९०
३	प्रसारीत करणारी संस्था/विद्यापीठ		वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
४	जमीन		काळी कसदार जमीन
५	हवामान		उत्तम पर्जन्यमान असलेले हवामान
६	पेरणी/लागवडीचा कालावधी		खरीप
७	प्रती एकर बियाणे		२५ किलो
८	पीक व्यवस्थापन		
	१	लागवडीचे/पेरणीचे व्यवस्थापन	पेरणी पाभरीच्या सहाय्याने १५ जून ते १५ जुलै दरम्यान करावी.
	२	खत व्यवस्थापन	८०:५०:५० नत्र, स्फुरद व पालाश कि./हे. द्यावे या खताची मात्रा तीन हफ्त्यात द्यावी. १. पेरणीच्या वेळी २० टक्के नत्र, १०० टक्के स्फुरद व पालाश पेरुन द्यावे. २. पेरणीनंतर ३० दिवसांनी ५० टक्के नत्र द्यावे. ३. पेरणीनंतर ६० दिवसांनी राहिलेले ३० टक्के नत्र द्यावे.
	३	पाणी व्यवस्थापन	पाऊसाचा ताण पडल्यास पाणी देणे आवश्यक आहे.
	४	कीड व्यवस्थापन	खोडकिडी : या किडीच्या नियंत्रणासाठी १६०० मिली क्विनॉलफॉस प्रती हेक्टरी ५०० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पाने गुंडाळणारी अळी : या किडीच्या नियंत्रणासाठी मोनोक्रोटोफॉस ७०० मिली किंवा क्लोरोपायरीफॉस २० ईसी १ लीटर ५०० लीटर पाण्यात मिसळून फवारावी.
	५	रोग व्यवस्थापन	करपा : हा एक बुरशीजन्य रोग असुन या पिकाच्या सर्वच अवस्थेत आढळुन येतो. मानेवरील करपा : यामध्ये लोंबीच्या देठावर गर्द, तपकिरी व काळे ठिपके पडुन मान कुजुन जाते. वरील रोगाच्या नियंत्रणासाठी प्रतीबंधात्मक उपाय म्हणून कार्बेन्डॉझिम २ ग्रॅम प्रती किलो बियाण्यास पेरणीपुर्वी बीजप्रक्रिया

		करावी.
९	**पिकाचा कालावधी**	१०० - १०२ दिवस
१०	**उत्पादकता**	१९-२२ क्विं. प्रती हेक्टरी
११	**वाणाची वैशिष्ट्ये/विशेष गुणधर्म**	१. पाण्याचा ताण सहन करणारा २. कोरडवाहू वाण ३. करपा रोगास सहनशील
१२	**वाणासंबंधीचे छायाचित्रे**	